शनिवार
०४
जुलै २०२६

वर्ष १९ वे
अंक - १६१
पाने - १०
किंमत - ५ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



## संगमनेरच्या सहकारातील महामेरु
# कै. बाळासाहेब उर्फ केरूजी हरूजी गुंजाळ पा.



यांना
## -॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥-

## सहकार, प्रामाणिकपणा आणि समर्पणाचा एक युगपुरुष हरपला



**मा. ना. बाळासाहेब थोरात**
माजी महसूलमंत्री, महाराष्ट्र राज्य

बाळासाहेब पाटील गुंजाळ यांचे निधन ही केवळ आमच्या परिवाराची किंवा सहकार क्षेत्राचीच नव्हे, तर संपूर्ण संगमनेर तालुक्याची मोठी हानी आहे. वयाची ९८ वर्षे त्यांनी अत्यंत समाधानी, समृद्ध आणि समाजहितासाठी समर्पित अशी जगले. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेरमध्ये सहकाराची जी पायाभरणी केली, त्या कार्याला बळ देणाऱ्या मोजक्या विश्वासू सहकाऱ्यांमध्ये बाळासाहेब गुंजाळ पाटील यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाईल.

साखर कारखाना, शेतकी संघ, दूध संघ, मार्केट कमिटी, सेवा सोसायटी तसेच विविध शैक्षणिक संस्थांमध्ये त्यांनी अत्यंत निष्ठेने काम केले. काटकसर, पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि शिस्त या मूल्यांचा त्यांनी आयुष्यभर आग्रह धरला. त्यामुळेच त्यांना सर्व स्तरातील कार्यकर्ते, शेतकरी आणि सहकारी संस्थांमधील पदाधिकारी यांचा मोठा सन्मान होता.

त्यांचा स्वभाव अत्यंत साधा, मनमिळावू आणि सर्वांना आपलेसे करणारा होता. त्यांनी आयुष्यभर व्यक्तीपेक्षा संस्था आणि स्वार्थापेक्षा समाजहिताला प्राधान्य दिले. आजच्या पिढीने त्यांच्या कार्याचा आणि मूल्यांचा आदर्श घेण्याची गरज आहे. त्यांच्या निधनाने सहकार क्षेत्रातील एक ज्येष्ठ मार्गदर्शक, मूल्यनिष्ठ कार्यकर्ता आणि आमच्या कुटुंबातील अत्यंत जिव्हाळ्याचा सहकारी आपण गमावला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.

## संस्था उभारणीत योगदान देणारे समर्पित सहकारी व्यक्तिमत्त्व



**मा. आ. डॉ. सुधीर तांबे**
माजी आमदार, विधान परिषद

बाळासाहेब पाटील गुंजाळ हे सहकार आणि शिक्षण क्षेत्रातील अत्यंत अभ्यासू, संयमी आणि समर्पित व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी कोणत्याही पदाचा कधीही गाजावाजा केला नाही; मात्र प्रत्येक जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे आणि दूरदृष्टीने पार पाडली. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्यात उभारल्या गेलेल्या अनेक सहकारी आणि शैक्षणिक संस्थांच्या जडणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान कायम स्मरणात राहील.

शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकार ही प्रभावी चळवळ बनावी यासाठी त्यांनी आयुष्यभर सातत्याने काम केले. संस्था उभी करणे जितके महत्त्वाचे असते, तितकेच त्या सक्षमपणे चालविणेही महत्त्वाचे असते, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी प्रशासनात शिस्त, आर्थिक पारदर्शकता आणि जबाबदारी यांना नेहमीच प्राधान्य दिले. त्यांच्या निधनाने संगमनेर तालुक्याने सहकार चळवळीतील एक अनुभवी, सुसंस्कृत आणि कर्तृत्ववान ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व गमावले आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली.

# सहकारी संस्थांचा आधारवड कै. बाळासाहेब उर्फ

## दानशूर, सुस्वभावी आणि सहकारातील आधारवड हरपला...!



संगमनेरचे माजी पोलीस पाटील तथा अमृत उद्योग समूहातील संस्थांच्या संस्थापकांपैकी एक असलेले कै. बाळासाहेब गुंजाळ पाटील यांच्या निधनाने संगमनेरच्या सहकार, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या जाण्याने गुंजाळवाडी, संगमनेर शहर आणि संपूर्ण पंचक्रोशीवर शोककळा पसरली आहे. कै. बाळासाहेब गुंजाळ पाटील यांचे आमचे वडील स्व. संभाजीराव थोरात (दादा) यांच्याशी अतिशय जिव्हाळ्याचे, कौटुंबिक आणि स्नेहाचे संबंध होते. दादांचे ते सख्खे मामेभाऊ होते. आमची शेजारी जमीन असल्याने दोन्ही कुटुंबांचे ऋणानुबंध अनेक दशकांपासून दृढ राहिले. राजकीय विचारांची वाटचाल स्वतंत्र असली, तरी परस्परांतील आपुलकी, विश्वास आणि सन्मान कधीही कमी झाला नाही. गुंजाळ परिवार आणि थोरात परिवार यांच्यातील हे जिव्हाळ्याचे नाते आजही तितकेच घट्ट आहे.

कै. बाळासाहेब गुंजाळ पाटील हे शांत, नम्र, संयमी, दयाळू आणि अहंकाराचा लवलेशही नसलेले व्यक्तिमत्त्व होते. इतरांना मदत करणे, सर्वांना सोबत घेऊन चालणे आणि समाजहिताला सर्वोच्च प्राधान्य देणे हीच त्यांच्या जीवनाची ओळख होती. म्हणूनच ते केवळ नावाचे पाटील नव्हते तर खऱ्या अर्थाने समाजाचे आधारवड होते. संगमनेर तालुका सहकारी शेतकी संघ, सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्था, संगमनेर सहकारी साखर कारखाना, संगमनेर सहकारी दूध संघ तसेच अमृतवाहिनी शेती व शिक्षण संस्थेच्या उभारणीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. अनेक संस्थांचे अध्यक्ष म्हणून त्यांनी यशस्वी नेतृत्व केले. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांचे निष्ठावंत सहकारी आणि कट्टर पाठीराखे म्हणून त्यांनी आयुष्यभर सहकार चळवळीला बळ दिले.

त्यांच्या दानशूर वृत्तीमुळे आणि मार्गदर्शनामुळे असंख्य संस्था उभ्या राहिल्या, अनेक कुटुंबांना आधार मिळाला आणि समाजाला दिशा मिळाली. आमच्या थोरात परिवाराच्या वाटचालीतही त्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. आमच्या यशामागे त्यांचेही आशीर्वाद आणि योगदान कायम राहिले. ते केवळ आमचे स्नेही नव्हते, तर कुटुंबातील ज्येष्ठ मार्गदर्शक होते. कै. बाळासाहेब गुंजाळ पाटील यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणारी नाही. त्यांची साधी राहणी, मोठेपणातही जपलेला साधेपणा, माणुसकी आणि समाजासाठीचे योगदान कायम स्मरणात राहील. एस. आर. थोरात उद्योग समूह व संपूर्ण थोरात परिवार गुंजाळ परिवाराच्या या दुःखात सहभागी असून, परमेश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो, तसेच त्यांच्या परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो अशी स्वामी गगनगिरी महाराजांच्या चरणी विनम्र प्रार्थना.

**श्री. आबासाहेब थोरात**
**संस्थापक,**
**एस.आर. थोरात उद्योग समूह, संगमनेर**



## समृद्ध सहकारातील सत्शील सहकारी, उत्कृष्ट प्रशासक आणि संगमनेरचे पाटील




एखादे व्यक्तिमत्त्व केवळ संपत्तीने मोठे नसते, तर आपल्या विचारांनी, संस्कारांनी, कर्तृत्वाने आणि माणुसकीने समाजाच्या मनावर अधिराज्य गाजवत असते. संगमनेरच्या सहकार, समाजकारण आणि लोकसेवेच्या इतिहासात स्वर्गीय केरूजी हरूजी उर्फ बाळासाहेब गुंजाळ यांचे नाव याच अर्थाने सदैव आदराने घेतले जाईल. त्यांच्या दशक्रिया निमित्त त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन. संगमनेरच्या प्रतिष्ठित गुंजाळ पाटील घराण्याचे ते ज्येष्ठ आधारस्तंभ होते. पोलीस पाटील म्हणून त्यांनी गावातील सामाजिक सलोखा, न्यायनिष्ठा आणि लोकांशी असलेले आत्मीय नाते आयुष्यभर जपले. अधिकाराच्या पदावर असूनही त्यांनी कधी अधिकाराचा गाजावाजा केला नाही; उलट प्रत्येकाला आपलेसे करणारी त्यांची साधी, संयमी आणि प्रेमळ वागणूक हीच त्यांची खरी ओळख होती.

सहकार क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य मोलाचे आणि प्रेरणादायी आहे. दूध संस्था, साखर कारखाना आणि विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकरी, दूध उत्पादक आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी त्यांनी निःस्वार्थपणे काम केले. सहकार म्हणजे केवळ संस्था नव्हे, तर विश्वास, पारदर्शकता, जबाबदारी आणि समाजसेवा यांचे प्रभावी माध्यम आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले. उत्कृष्ट प्रशासक म्हणून त्यांची कार्यशैली विशेष उल्लेखनीय होती. आर्थिक शिस्त, प्रामाणिक व्यवहार, निर्णयक्षम नेतृत्व आणि प्रत्येक बाबतीत पारदर्शकता यामुळे त्यांच्यावर सर्वांचा अढळ विश्वास होता. संचालक, कर्मचारी, शेतकरी किंवा सामान्य नागरिक-प्रत्येकाला त्यांनी समान सन्मान दिला. अधिकार आणि माणुसकी यांचा सुंदर समतोल त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येत असे.

स्वच्छ पांढरा पोशाख, कपाळावरील गंध, गळ्यातील तुळशीची माळ, चेहऱ्या वरील प्रसन्न हास्य आणि शांत, संयमी स्वभाव ही त्यांची कायमची ओळख होती. एवढ्या मोठ्या संपन्न घराण्याचे प्रतिनिधित्व करूनही त्यांच्या वागण्यात कधीही अहंकार नव्हता. त्यांच्या घराचे दरवाजे आणि मनाचे दरवाजे दोन्ही समाजासाठी कायम खुले होते. स्वर्गीय भाऊसाहेब थोरात यांच्यावरील त्यांची निष्ठा, सहकार चळवळीप्रती असलेली बांधिलकी आणि अमृतवाहिनी शिक्षण संस्थेच्या विश्वस्त म्हणून केलेले योगदान हे त्यांच्या सार्वजनिक जीवनातील सुवर्ण अध्याय आहेत. त्यांनी अनेक कार्यकर्त्यांना संधी दिली, मार्गदर्शन केले आणि विश्वास देऊन उभे केले. अनेकांच्या आयुष्याला दिशा देणारे ते खऱ्या अर्थाने प्रेरणास्थान होते. आज ते आपल्यात नसले तरी त्यांची मूल्ये, त्यांची कार्यनिष्ठा, त्यांचा साधेपणा आणि माणुसकीचा वारसा कायम जिवंत राहील. त्यांच्या स्मृती समाजाला सदैव प्रेरणा देत राहतील. सहकार क्षेत्रातील हा ऋषितुल्य कार्यकर्ता, लोकाभिमुख प्रशासक आणि माणुसकीचा उपासक यांना हीच खरी आदरांजली. स्वर्गीय केरूजी हरूजी (बाळासाहेब) गुंजाळ यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास सद्गती देवो आणि गुंजाळ पाटील परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, हीच प्रार्थना.

**- श्री. नवनाथ अरगडे,**
**संचालक, स.म.भा.सं. थोरात साखर कारखाना, संगमनेर**













# केरूजी हरूजी गुंजाळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

## तालुक्यातील एक नंबरचे जमीनदार मात्र पाय जमिनीवर असलेला अवलिया...!

आम्ही शिक्षणासाठी पानोडी सोडून संगमनेरला आलो त्यावेळी आमचे बालपण बाळासाहेब पाटलांच्या भव्य वाड्यातच गेले. त्या वाड्याला शोभेल असेच पाटील होते. या वाड्याला बाळ पाटलांचा वाडा असे म्हणत. बाळासाहेब पाटील सर्वांगिण सुंदर व्यक्तिमत्व दिसायला तर होतेच परंतु त्या पेक्षाही वागायला अतिशय सुंदर होते. मनाने अतिशय हळवे होते. नम्रता काय असावी ही बाळासाहेब पाटलांकडून शिकावी. पाटील वाड्याच्या भव्य दरवाजा बाहेर पडल्यावर पाटलांचे दोन्ही हात जोडलेले असायचे. लहान असो मोठा असो त्यास दोन्ही हात जोडूनच नमस्कार करावयाचे. एक काळ असा होता पाटलांचा वाडा, त्यातील चौक भरगच्च भरलेला असायचा. पाटील खुर्चीवर बसलेले असायचे. आलेल्या व्यक्तीचे सुहास्य वदनाने दोन्ही हात जोडून स्वागत करावयाचे. पाटलांच्या वाड्यातून एकही माणूस विनमुख गेला नाही. आलेल्या माणसाची अस्थेने चौकशी करणार जेवला कि नाही विचारणार. संगमनेर तालुक्यातील एक नंबरचे जमीनदार असूनही त्यांचे जमिनीवर पाय होते. कोणताही अभिमान नाही. गर्व नाही. अत्यंत हळवा स्वभाव, गरिबांविषयी कणव, अतिरेकपणा नाही रागावणे नाही, अत्यंत स्वच्छ समंजस सोज्वळ व्यक्तिमत्व, प्रचंड बुद्धिमत्ता, आदरणीय स्वर्गीय भाऊसाहेब थोरात व बाळासाहेब पाटील गुंजाळ, कारभारी मामा, प्रभाकर भोर, शिवाजीराव थोरात या सर्वांनी हातात हात घालून या तालुक्याचे शेतकऱ्यांचे संसार उभे केले. अडल्या नडल्याना नेहमीच मदतीचा हात दिला. दूध धंदा प्रचंड वाढविला. संपूर्ण तालुक्यामध्ये सायफनचे जाळे केले. ही भूमी सुजलाम सुफलाम केली. सहकार वाढविला. संगमनेरच्या सहकाराने महाराष्ट्राला दिशा दिली. साखर कारखाना असो दूध संघ असो की शेतकी संघ असो त्या संस्था पुढे कशा येतील यासाठीच जीवापाड प्रयत्न केले. सह्याद्री हायस्कूल, एडीसीसी बँक, विज बोर्ड यासाठी बाळासाहेब पाटलांनी विनामूल्य जागा दिली. शेकडो एकर जमिनी कुळांकडे गेल्या तरी त्यांच्याशी संबंध खूप चांगले ठेवले. संगमनेरमध्ये झालेल्या हिंदू मुस्लिम दंगलीमध्ये मुस्लिमांनी बाळासाहेब पाटील गुंजाळ यांच्या वाड्यात संरक्षण दिले होते. हा प्रसंग सर्व जाती धर्मातील लोकांना त्यांच्याविषयी किती आदर व प्रेम होते हे सांगणार आहे. अशा या निर्मळ थोर व्यक्तिमत्वास भावपूर्ण श्रद्धांजली

**ॲड. सदाशिवराव थोरात,**
**संगमनेर, ९८५०६८३३९३**

## गुंजाळ परिवाराचे आधारस्तंभ, संगमनेरचे पोलिस पाटील

### स्वर्गीय केरूजी हरूजी उर्फ बाळासाहेब गुंजाळ पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली

आदरणीय कै. केरूजी हरूजी उर्फ बाळासाहेब गुंजाळ पाटील (दादा) यांच्या निधनाने संगमनेरच्या सामाजिक, सहकारी आणि ऐतिहासिक परंपरेतील एक सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. वयाच्या ९८ व्या वर्षी त्यांचे निधन होऊन एका युगाचा अंत झाला आहे. स्वर्गीय बाळासाहेब हे साधेपणा, प्रामाणिकपणा आणि निगर्वी स्वभावाचे मूर्तिमंत उदाहरण होते. पांढरा पायजमा, पांढरा शर्ट, डोक्यावर कडक टोपी आणि चेहऱ्यावर प्रसन्न हास्य ही त्यांची कायमची ओळख होती. मोठेपणा असूनही त्यांच्या वागण्यात कधीही अहंकार नव्हता. सर्वांशी प्रेमाने आणि आपुलकीने वागणे हा त्यांचा स्वभाव होता.

संगमनेरच्या देवी गल्लीतील सुमारे ३५० वर्षांचा भव्य चौसोपी वाडा हा त्यांच्या घराण्याच्या वैभवशाली इतिहासाचा साक्षीदार आहे. त्या वाड्यातून त्यांनी सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. संगमनेर सहकारी साखर कारखाना, दूध संघ, शेतकी संघ आणि पावबाकी सोसायटीचे चेअरमन म्हणून त्यांनी जबाबदारीने काम केले. तसेच अमृतवाहिनी शेती व शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व विश्वस्त म्हणूनही त्यांनी मोलाचे योगदान दिले. गुंजाळवाडी येथील शेती, पशुपालन आणि कृषी व्यवस्थापनातून त्यांनी शेतीप्रेम आणि कष्टाची परंपरा जपली. माझे बालपण गुंजाळवाडीत गेल्याने त्यांच्या परिवाराचा सहवास लाभला. गेली अनेक वर्षे नाशिक येथे वास्तव्यास असूनही गावाला गेल्यावर बाळासाहेब आणि स्वर्गीय जयंतराव पाटील यांची भेट घेतल्याशिवाय मुक्काम पूर्ण होत नसे. प्रत्येक भेटीत त्यांचे प्रेम, आपुलकी आणि साधेपणा अनुभवायला मिळत असे.

स्वर्गीय बाळासाहेब गुंजाळ पाटील यांचे कार्य, त्यांचे संस्कार आणि त्यांची माणुसकी पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. स्वर्गीय केरूजी हरजी उर्फ बाळासाहेब गुंजाळ पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली! ॐ शांती!

**- श्री. प्रकाश गुंजाळ**
**संचालक, ग्लोबल प्लेसमेंट**
**अँड करिअर गाईड सेंटर, नाशिक**

## सहकारात सक्षम सहकाऱ्यांची फळी निर्माण करणाऱ्या स्व. बाळासाहेब गुंजाळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली



संगमनेर शहराला समृद्ध इतिहास, परंपरा आणि संस्कृतीचा गौरवशाली वारसा लाभला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यकाळापासून अनेक कर्तृत्ववान घराण्यांनी या भूमीची सामाजिक, प्रशासकीय आणि सांस्कृतिक ओळख जपली. अशाच मानाच्या घराण्यांपैकी गुंजाळ पाटील घराणे हे एक प्रतिष्ठित नाव. या घराण्याचे ज्येष्ठ आधारस्तंभ, संगमनेर पंचक्रोशीचे पाटील म्हणून सर्वदूर परिचित असलेले स्वर्गीय केरूजी हरूजी उर्फ बाळासाहेब गुंजाळ पाटील यांच्या निधनाने संगमनेरने आपल्या इतिहासातील एक संयमी, सेवाभावी आणि मूल्यनिष्ठ व्यक्तिमत्त्व गमावले आहे. संगमनेरच्या देवी गल्लीतील त्यांचा चौसोपी भव्य वाडा हा केवळ संपन्नतेचे प्रतीक नव्हता, तर सामाजिक नेतृत्व, लोकसंपर्क आणि न्यायनिष्ठ परंपरेचा साक्षीदार होता. सुकेवाडी, घुलेवाडी, पावबाकी, गुंजाळवाडीसह पंचक्रोशीतील अनेक गावांच्या पाटीलकीची जबाबदारी या घराण्याकडे होती. त्या काळी शासकीय कामकाजाबरोबरच जनतेच्या अडचणी सोडविण्याचे, तंटे मिटविण्याचे आणि समाजात सलोखा राखण्याचे महत्त्वपूर्ण कार्य याच वाड्यातून होत असे. त्या परंपरेचे जतन बाळासाहेबांनी अत्यंत संयमाने आणि जबाबदारीने केले.

बाळासाहेब गुंजाळ पाटील यांचा स्वभाव अतिशय नम्र, शांत आणि खानदानी होता. मोठेपणा असूनही अहंकार नव्हता. प्रत्येकाशी स्नेहाने, आदराने आणि मृदू भाषेत संवाद साधणे ही त्यांची जीवनशैली होती. त्यांचे धाकटे बंधू स्वर्गीय जयवंतराव उर्फ काका यांच्याशी त्यांचे अतूट बंधुप्रेम अखेरपर्यंत कायम राहिले. आज दोघेही आपल्यात नसले तरी त्यांच्या नात्याचा आदर्श आजही अनेकांच्या स्मरणात आहे. स्वातंत्र्यानंतर सहकार महर्षी स्वर्गीय भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर तालुक्यात सहकार चळवळीची मजबूत पायाभरणी केली. त्या कार्यात बाळासाहेब गुंजाळ पाटील यांनी निष्ठेने आणि प्रामाणिकपणे मोलाची साथ दिली. शेतकी संघाच्या स्थापनेपासून विविध सहकारी संस्थांच्या उभारणीत त्यांचा सक्रिय सहभाग होता. शेतकी संघाच्या गोडाऊनमध्येच संगमनेर सहकारी दूध संघाची सुरुवात झाली आणि पुढे १९८४ मध्ये ते दूध संघाचे चेअरमन म्हणून कार्यरत राहिले. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने विश्वास, शिस्त आणि पारदर्शकतेची परंपरा जपली.

भाऊसाहेब थोरात हे माणसांची पारख करणारे दूरदृष्टीचे नेते होते. त्यांनी संगमनेरच्या सहकारासाठी अनेक सक्षम सहकाऱ्यांची फळी उभी केली. त्या विश्वासू सहकाऱ्यांमध्ये बाळासाहेब गुंजाळ पाटील यांचे स्थान अत्यंत मानाचे होते. भाऊसाहेबांच्या निधनानंतरही माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी त्यांना ज्येष्ठ सहकारी म्हणून नेहमीच सन्मान दिला आणि त्यांच्या अनुभवाचा लाभ घेतला. हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी पावती होती. संगमनेरच्या सामाजिक, सहकारी आणि सार्वजनिक जीवनात बाळासाहेब गुंजाळ पाटील यांनी जपलेली मूल्ये, त्यांचा साधेपणा, सेवाभाव आणि माणुसकी हा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठेवा आहे. त्यांचे जीवन हे पदापेक्षा कर्तृत्व मोठे असते आणि संपत्तीपेक्षा संस्कार श्रेष्ठ असतात, याचे जिवंत उदाहरण होते.

आज ते आपल्यात नसले तरी त्यांच्या कार्याच्या खुणा संगमनेरच्या इतिहासात, सहकाराच्या वाटचालीत आणि असंख्य लोकांच्या स्मरणात सदैव जिवंत राहतील. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली.

**- किसन भाऊ हासे,**
**संस्थापक - संपादक, दैनिक युवावार्ता, संगमनेर**

## ऋणानुबंध जपणारे व्यक्तीमत्व म्हणजे स्वर्गीय आदरणीय बाळासाहेब पाटील गुंजाळ




सहकार क्षेत्रात अतुलनीय योगदान देणारे स्व. बाळासाहेब उर्फ केरुजी हरुजी गुंजाळ पाटील दादा यांनी कायम ऋणानुबंध जपण्याचे व सन्मानपुर्वक जीवन जगण्याचा मंत्र दिला. समाजकल्याणासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. स्व. दादांचे कार्य हे पुढील पिढीला सदैव प्रेरणा देणारे आहे. माझे चिरंजीव सिव्हिल इंजिनिअर श्री.विशाल देशमुख यांचा विवाह स्व. दादांची नात यशोमती यांचेशी आठ वर्षांपूर्वी झाला. माझी अनेक वर्षांपासून दादांचे चिरंजीव श्री. राजाभाऊ पाटील गुंजाळ यांचेशी मैत्री होती. आमच्या मैत्रीचे रुपांतर कौटुंबिक ऋणानुबंधात झाले. त्यामुळे स्व. दादांशी संवाद साधण्याचा कायम योग येत असे. स्व. दादांचे धांदरफळ बु. येथील घरी आमचे घरी येणे होत असायचे. कुटुंबातील सर्वांची आस्थेवाईकपणे चौकशी ते करत असत. आमची नात दूर्वा हिच्या बरोबर खूप मिश्किल गप्पा करत असत. पारिवारिक संबंध त्यांनी जपले आणि वाढविले. शेती, पिके याबाबत सदैव चर्चा होत होती.

आदरणीय सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात दादा यांचे सहकारी म्हणुन त्यांनी कार्य केले. सहकार व शिक्षण क्षेत्रात त्यांनी विशेष कार्य केले. त्यांची प्रेरणा घेऊनच राजाभाऊ गुंजाळ पाटील हे सामाजिक व राजकीय जीवनात कार्यरत आहेत. आवडीच्या विविध पुस्तकांचे वाचन त्यांनी आयुष्यभर केले. नियमितपणे वर्तमानपत्रे वाचने हा त्यांचा आवडता छंद. साधी राहणी व उच्च विचारसरणी याप्रमाणे त्यांचे जीवन राहिले. विरंगुळा या त्यांचे निवासस्थानी स्व. दादांची सदैव भेट आणि चर्चा होत असायची. या भेटीत कायम तालुक्याचे राजकारण, राजकीय परिस्थिती तसेच अमृत उद्योग समूहातील सर्व संस्थेची बारकाईने विचारपूस करत यावर चर्चा होत असायची. आदरणीय बाळासाहेब थोरात साहेब यांच्या बद्दल विचारपूस करणार त्यांच्या कार्याचा त्यांना विशेष अभिमान होता.

राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराज यांच्यावर त्यांची मोठी श्रद्धा होती. तन, मन आणि धनाने त्यांनी अध्यात्माची सेवा केली. स्वतचे जीवनावर राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराज यांची कृपादृष्टी आहे असे ते नेहमी सांगत होते. स्वर्गीय दादांना आम्ही जय बाबाजी म्हणत असत. दादांचे बंधु स्व. जयवंतराव गुंजाळ काका व स्वर्गीय मातोश्री सुशीलाबाई माई गुंजाळ यांनीही सर्व नातेवाईकांना प्रेम, जिव्हाळा दिला. स्व. जयवंतराव काका यांचाही मोठा जनसंपर्क होता. तसाच व्यापक जनसंपर्क स्व. दादांचा राहीला आहे. स्व. बाळासाहेब पाटील व स्व. जयवंतराव पाटील यांचा समर्थ वारसा श्री राजाभाऊ गुंजाळ पाटील व परिवार चालवत आहेत. मनाने निर्मळ, उच्च विचारसरणी असलेले, निगर्वी आणि प्रेमळ स्वभावाचे दादा होते. त्यांचे निधनामुळे संगमनेर तालुक्यातील एक सच्चा सहकारी काळाच्या पडद्याआड गेला आहे. आमचेसाठी ऋणानुबंध जपणारा एक तेजस्वी तारा निखळला गेला आहे. स्व. दादांच्या स्मृती आठवणींच्या रुपाने सदैव आम्हांला प्रेरणादायी ठरणार आहेत. स्व. दादांच्या पवित्र स्मृतीस व त्यांच्या कर्तृत्वास विनम्र अभिवादन तसेच भावपूर्ण आदरांजली. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच प्रार्थना. देशमुख परिवार

**श्री. अनिलराव देशमुख,**




संगमनेर पंचक्रोशीचे पाटील व सहकारातील सत्शील व्यक्तीमत्त्व
सहकारातील अनेक संस्थांचे प्रमुख राहिलेले

**कै. बाळासाहेब गुंजाळ पाटील**

यांना ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

- शोकाकूल -

**कृषी उत्पन्न बाजार समिती**
**संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर**

उपबाजार – निमोण, तळेगाव, आश्वी बु., घारगाव, वडगांव पान, साकुर

– विद्यमान संचालक मंडळ –

श्री. शंकरराव हनुमंत खेमनर (सभापती)
श्री. गिताराम दशरथ गायकवाड (उपसभापती)
श्री. सतिष माधवराव गुंजाळ (कार्यकारी संचालक)

श्री. कैलास बाळासाहेब पानसरे, श्री. निलेश बबन कडलग, श्री. सखाहरी बबन शेरमाळे, श्री. संजय दादा खरात
श्री. सतिष विश्वनाथ खताळ, श्री. मनिष सुर्यभान गोपाळे, श्री. निसार गुलाब शेख, श्री. मनसुख शंकर भंडारी
सौ. दिपाली भाऊसाहेब वर्पे, श्री. विजय विठ्ठल सातपुते, श्री. सुरेश रामचंद्र कान्होरे, श्री. अनिल शिवाजी घुगे
श्री. अरूण तुळशीराम वाघ, श्री. सुधाकर पुंजाजी ताजणे, सौ. रूक्मिणी शिवाजी साकोरे, श्री. सचिन बाळकृष्ण कर्पे

**सर्व शेतकरी, व्यापारी व आडतदार वर्ग, कृषी उत्पन्न बाजार समिती, संगमनेर**



संगमनेर पंचक्रोशीचे पाटील व सहकारातील सत्शील व्यक्तीमत्त्व
सहकारातील अनेक संस्थांचे प्रमुख राहिलेले

**कै. बाळासाहेब गुंजाळ पाटील**

यांना ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



**ग्रामपंचायत कार्यालय, गुंजाळवाडी**
**ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

सरपंच - श्री. नरेंद्र उर्फ अमोल संभाजी गुंजाळ
उपसरपंच - श्री. अमोल विलास गुंजाळ
ग्रामविकास अधिकारी - श्री. भगवान ज्ञानोबा भांड

सदस्य – श्री. पंडीत भास्कर गुंजाळ, सौ. उज्वला सुभाष गुंजाळ, सौ. पद्मा संजय बर्डे, श्री. भाऊसाहेब रखमा गुंजाळ, सौ. आरती अनिल गुंजाळ, सौ. सविता बाबासाहेब गुंजाळ, श्री. विलास लहानु निघुते, सौ. सुनिता रमेश गुंजाळ, श्री. अशोक प्रभाकर गुंजाळ, सौ. नयना कैलास रहाणे, सौ. लक्ष्मी दशरथ तुपसुंदर, श्री. पोपट कारभारी अरगडे, श्री. अतुल साहेबराव अभंग, सौ. ललिता मारूती शिंदे, श्री. मच्छिंद्र रामचंद्र राहाणे, सौ. संगिता शांताराम अरगडे
सर्व कर्मचारी वृंद व ग्रामस्थ गुंजाळवाडी



संगमनेर पंचक्रोशीचे पाटील व सहकारातील सत्शील व्यक्तीमत्त्व
सहकारातील अनेक संस्थांचे प्रमुख राहिलेले

**कै. बाळासाहेब गुंजाळ पाटील**

यांना ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



**श्री. बाळासाहेब पा. गुंजाळ, गुंजाळवाडी, पावबाकी**
**वि. का. से. सह. सोसायटी लि. संगमनेर बु ॥, ता. संगमनेर**

श्री. मच्छिंद्र काशिनाथ गुंजाळ (चेअरमन)
श्री. नवनाथ चंद्रभान गुंजाळ (चेअरमन)

संचालक मंडळ – श्री. दगडू भगवंता गुंजाळ, श्री. संपत लहानु अरगडे, श्री. गुलाब बाळु गुंजाळ, श्री. संभाजी दामु गुंजाळ, श्री. नामदेव विठोबा गुंजाळ, श्री. राजेंद्र मारूती गुंजाळ, श्री. शांताराम राणुजी दारोळे, श्री. सुधाकर पुंजाजी ताजणे, श्री. आण्णासाहेब रामनाथ गोफणे, सौ. लताबाई बाबुराव गुंजाळ, सौ. रेखा महेंद्र गुंजाळ

सेवक वर्ग – श्री. बाबासाहेब नाना भवर (सचिव), श्री. महेश भास्कर गुंजाळ (सह सचिव) श्री. नंदु यशवंत गुंजाळ (मदतनीस)



संगमनेर पंचक्रोशीचे पाटील व सहकारातील सत्शील व्यक्तीमत्त्व
सहकारातील अनेक संस्थांचे प्रमुख राहिलेले

# कै. बाळासाहेब गुंजाळ पाटील

यांना ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

- शोकाकूल -

## संगमनेर शेतकी सहकारी संघ लि. संगमनेर

सुदर्शन प्रभा, कॉलेज रोड, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर


| मा. श्री. संपतराव विष्णू डोंगरे | मा. श्री. सुनिल जयराम कडलग | मा. श्री. अनिल ज्ञानदेव थोरात |
|---|---|---|
| (चेअरमन) | (व्हा. चेअरमन) | (मॅनेजर) |

– संचालक मंडळ –

| | | | |
|---|---|---|---|
| मा. श्री. साहेबराव बाबुराव बारवे | मा. श्री. बाळकृष्ण ठकाजी होडगर | ॲड. श्री. ज्ञानेश्वर हरिभाऊ सांगळे | मा. श्री. किरण भागाजी नवले |
| मा. श्री. भाऊसाहेब सावळेराम नवले | मा. श्री. संतोष रामभाऊ नागरे | मा. श्री. तुकाराम रामभाऊ कोठवळ | मा. श्री. सचिन रामनाथ दिघे |
| मा. श्री. शिवाजी सुखदेव आहेर | मा. श्री. प्रभाकर संभाजी सोनवणे | मा. श्री.महादू सखाराम खेमनर | मा. श्री. संजय सहादू क्षीरसागर |
| मा. श्री.भास्कर पाटीलबा गोपाळे | मा. श्री. विनायक बाजीराव काळे | मा. सौ. मंगल कैलास ठाकरे | मा. सौ. प्रभावती ज्ञानदेव ढोकरे |
| | | | मा. उपनिबंधक साहेब,सह संस्था |

**संगमनेर शेतकी सह. संघ लि. संगमनेर सर्व संचालक मंडळ,सभासद वर्ग, अधिकारी व कर्मचारी वृंद**










## स्व. बाळासाहेब गुंजाळ पाटील : शेतकी संघाच्या प्रगतीचे शिल्पकार

संगमनेर शेतकी सहकारी संघ मर्या., संगमनेरच्या विकासात स्व. बाळासाहेब गुंजाळ पाटील यांचे योगदान अत्यंत मोलाचे आणि प्रेरणादायी राहिले आहे. संस्थेच्या स्थापनेनंतरच्या जडणघडणीच्या काळात त्यांनी विविध जबाबदाऱ्या अत्यंत प्रामाणिकपणे आणि दूरदृष्टीने पार पाडल्या. सन १९६० ते १९६२ या कालावधीत त्यांनी संचालक म्हणून कार्य करत संस्थेच्या बळकटीसाठी योगदान दिले. त्यानंतर १९६३ ते १९७७ या सलग पंधरा वर्षांच्या कालावधीत व्हाइस चेअरमन म्हणून संस्थेच्या विकासाला नवी दिशा दिली. पुढे १९७८ ते १९९० या काळात पुन्हा संचालक म्हणून कार्यरत राहून संस्थेच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला. त्यानंतर १९९१ ते १९९८ या कालावधीत चेअरमन म्हणून नेतृत्व करत शेतकरी हिताच्या अनेक उपक्रमांना चालना दिली.

सलग सुमारे ३८ वर्षे विविध पदांवर राहून त्यांनी शेतकी संघाच्या प्रगतीसाठी अविरत कार्य केले. त्यांच्या नेतृत्वामुळे संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली, शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आणि सहकार क्षेत्रात आदर्श स्थान निर्माण केले. स्व. बाळासाहेब गुंजाळ पाटील यांचे कार्य, त्यांची प्रामाणिकता, दूरदृष्टी आणि सहकाराप्रती असलेली निष्ठा शेतकी संघाच्या इतिहासात सदैव सुवर्णाक्षरांनी नोंदली जाईल. त्यांच्या स्मृतीस संगमनेर शेतकी सहकारी संघ मर्या., संगमनेरतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

**श्री. संपतराव विष्णू डोंगरे**
**चेअरमन, संगमनेर शेतकी संघ**








सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
(थोर स्वातंत्र्यसेनानी)

थोर स्वातंत्र्य सैनिक भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर तालुक्यात विकासाचा मंत्र घुमवून शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर व कामगार यांच्यासाठी उभारलेली प्रतिसृष्टी

# अमृत उद्योग समुह




## अथक 65 वर्षांची रचनात्मक वाटचाल

**सहकारातील अग्रगण्य संस्था**

- सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि, अमृतनगर
- संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित, संगमनेर
- अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था, अमृतनगर
- सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि, अमृतनगर
- सौ. मथुराबाई भाऊसाहेब थोरात सेवाभावी ट्रस्ट
- संगमनेर शेतकी संघ लि,संगमनेर
- संगमनेर ॲग्रीकल्चर प्रोड्युस ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि, अमृतनगर
- राजहंस ॲग्रीकल्चर ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि, अमृतनगर
- संगमनेर ता. ॲग्रीकल्चर प्रोड्यूस प्रोसेसिंग मार्केटिंग को-ऑप सोसा. मर्या
- गरुड सहकारी कुक्कुट पालन व्यावसायिक संस्था लि, घुलेवाडी
- सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर
- हरिश्चंद्र सहकारी पाणी पुरवठा संस्थांचे सहकारी फेडरेशन



संगमनेरच्या सहकार क्षेत्रातील
सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात (दादा)
यांचे खंबीर सहकारी

# कै. बाळासाहेब उर्फ केरुजी हरुजी गुंजाळ पाटील

यांना ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

- शोकाकूल : अमृत उद्योग समूह







# सहकारातील संत हरपला...



**सन १९८१ - ४५ वर्षांपूर्वी सहकारमहर्षी तिर्थरूप भाऊसाहेब थोरात व बाळासाहेब गुंजाळ पाटील यांच्या समवेत मौजे नांदूर शिंगोटे येथील निवासस्थानी सदिच्छा भेट**

सहकार, समाजकारण, माणुसकी आणि साधेपणाची परंपरा जपणारे संगमनेरचे ज्येष्ठ मार्गदर्शक स्वर्गीय केरूजी हरूजी उर्फ बाळासाहेब पाटील गुंजाळ यांच्या निधनाने सहकार चळवळीतील एक युग संपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एका प्रतिष्ठित घराण्याचा आधारवड हरपला नाही, तर सहकार क्षेत्रातील एक संतस्वभावी, निस्वार्थी आणि माणुसकी जपणारा देवमाणूस काळाच्या पडद्याआड गेला आहे. संगमनेरमधील गुंजाळ पाटील घराणे हे संपन्न, प्रतिष्ठित आणि सामाजिक बांधिलकी जपणारे घराणे म्हणून ओळखले जाते. शहरापासून गुंजाळवाडी, इंदिरानगर, अकोले रोड, राजापूर रोड, वेल्हाळे तसेच विविध भागांत त्यांची शेती, जमीन जुमला. मात्र एवढी संपन्नता असूनही या घराण्यात कधी अहंकार नव्हता, गर्व नव्हता आणि स्वार्थालाही स्थान नव्हते. समाजासाठी दातृत्व, लोकहिताची भावना आणि उदार अंतःकरण हा त्यांचा वारसा होता.

काही माणसे संपत्तीने मोठी असतात; पण फार थोडी माणसे विचारांनी, संस्कारांनी आणि माणुसकीने श्रीमंत असतात. स्वर्गीय बाळासाहेब पाटील हे अशाच दुर्मिळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. त्यांचे संपूर्ण आयुष्य साधेपणाचे प्रतीक होते. स्वच्छ पांढरा पायजमा, नेहरू शर्ट, डोक्यावर टोपी, कपाळी गंध, गळ्यात रुद्राक्षाची माळ आणि अंगी असलेला नीटनेटकेपणा ही त्यांची कायमची ओळख होती. गोरी, सडपातळ देहयष्टी आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व हे परमेश्वराने दिलेले वरदानच होते. इंग्रजकालापासून देवी गल्लीतील त्यांचा भव्य सागवानी वाडा संगमनेरच्या इतिहासाचा साक्षीदार होता. बाहेरून भव्य वाटणाऱ्या त्या वाड्याचे खरे वैभव मात्र आतल्या माणुसकीत होते. वाड्यात आलेल्या प्रत्येकाचे आदरातीर्थ, चहापान, प्रेमाने विचारपूस आणि वैचारिक देवाणघेवाण हे त्या घराण्याचे वैशिष्ट्य होते. स्वर्गीय बाळासाहेबांचे धाकटे बंधू स्वर्गीय जयवंतराव पाटील हेही तितकेच धाडसी आणि समाजकारणात राजकारणात धार्मिक कार्यात सक्रिय होते. दोन्ही बंधूंनी स्वर्गीय भाऊसाहेब थोरात यांना आयुष्यभर खंबीर साथ दिली. सहकार, शिक्षण आणि शेतकरी चळवळीत त्यांनी निष्ठेने कार्य केले. माझ्या आयुष्यातही स्वर्गीय जयवंतराव पाटलांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. फेब्रुवारी १९८० मध्ये त्यांनी मला त्यांच्या दूध सोसायटीत सचिव म्हणून काम करण्याची संधी दिली. माझ्याकडे केवळ बी.कॉम.चे शिक्षण आणि अकाउंटंट ऑडिट कामाचा अनुभव होता. त्यांचे माझे कोणतेही नाते नव्हते, ओळख नव्हती, जात-पात किंवा धर्म माहित नव्हता. त्यांनी फक्त माझ्या प्रामाणिकपणावर आणि काम करण्याच्या वृत्तीवर विश्वास ठेवला. त्या विश्वासामुळेच माझ्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. पुढे बाळासाहेब पाटील यांचाही सहवास लाभला आणि मला स्वर्गीय भाऊसाहेब थोरात यांच्यासारख्या महान नेत्यांच्या जवळ काम करण्याचे भाग्य लाभले. शेतकरी, दूध उत्पादक आणि कष्टकरी जनतेच्या सेवेला वाहून घेण्याची प्रेरणा याच काळात मिळाली. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांची ओळख झाली. सहकार चळवळ ही केवळ संस्था नसून समाजपरिवर्तनाचे आणि आर्थिक उन्नतीचे. प्रभावी माध्यम आहे, याची जाणीव झाली.

सन १९८४ मध्ये स्वर्गीय बाळासाहेब गुंजाळ दूध संघाचे चेअरमन असताना त्यांच्या आणि तीर्थरूप भाऊसाहेब थोरात यांच्या संमतीने माझी मॅनेजरपदी नियुक्ती झाली. त्या काळात सहकारी संस्थांमध्ये आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदांच्या उत्तरदायित्वाला सर्वोच्च महत्त्व होते. प्रत्येक खर्चाचा सविस्तर खुलासा संचालक मंडळासमोर होत असे. शेतकऱ्यांच्या उसाला योग्य दर, दूध उत्पादकांना दिवाळी बोनस आणि कामगारांना सन्मान देण्याची मूल्यव्यवस्था त्यांनी जपली. या यशामागे स्वर्गीय बाळासाहेब गुंजाळ यांच्यासारख्या विश्वासू, निस्वार्थी आणि खंबीर सहकाऱ्यांचा मोठा वाटा होता. दूध संघात काम करत असताना काटकसर, आर्थिक शिस्त याची कधीही तडजोड केली नाही. संस्थेच्या कारभाराची जबाबदारी व वैयक्तिक प्रेम या दोन भिन्न गोष्टी आम्ही आयुष्यभर जपल्या. स्वर्गीय बाळासाहेब गुंजाळ यांनी अमृतवाहिनी शिक्षण संस्थेचे आयुष्यभर विश्वस्त म्हणून अत्यंत प्रामाणिकपणे कार्य केले. शिक्षण, सहकार आणि समाजकारण या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी मौल्यवान योगदान दिले. त्यांनी वयाची शंभरी पूर्ण करावी, अशी मंत्री थोरात साहेब यांची इच्छा होती. परंतु नियतीला ते मान्य नव्हते. वयाच्या ९८ व्या वर्षी त्यांनी सर्वांचा निरोप घेतला. मार्च २०२६ मध्ये साखर कारखान्याच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटनानंतर त्यांच्या वस्तीवर झालेल्या भेटीत त्यांनी आपले नेते बाळासाहेब थोरात यांच्याविषयी मनापासून प्रशंसा व्यक्त केली होती. मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांनी जुन्या सहकाऱ्यांविषयीचे प्रेम, निष्ठा आणि ऋणानुबंध शेवटपर्यंत जपले. आपले नेते माजी मंत्री बाळासाहेब यांनी सर्व आजी चेअरमन यांचा सन्मान केला एवढे दूरदर्शी व संवेदनशील नेतृत्व आज राज्यात कोठेही दिसत नाही. गुंजाळ पाटलांच्या कौटुंबिक जीवनात अनेक चढ-उतार आले, तरी त्यांनी संयम, सहनशीलता, नम्रता आणि शांत स्वभाव कधीही सोडला नाही. गुरुवर्य राष्ट्रसंत महंत जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराज यांचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी होते. अध्यात्म, सेवा व सदाचार या मार्गाने ते अखंड चालत राहिले. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. स्वर्गीय बाळासाहेब पाटील गुंजाळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**- मा. श्री. एन एम मंडलिक**
**माजी मॅनेजर राजहंस दूध संघ संगमनेर.**

# आमचे मामा कै. बाळासाहेब गुंजाळ पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## समाज आणि सहकार संत



आज परम आदरणीय तीर्थ स्वरूप मामासाहेब बाळासाहेब पाटील गुंजाळ यांचे बद्दल लिहिताना मन अतिशय भरून आलंय. त्यांचा स्वभाव हा शांत, संयमी, मितभाषी, परोपकारी, सामाजिक तसेच त्यांचा पिंड हा आध्यात्मिक होता.

**वैष्णव जण तो तेणे कहीयोरे,**
**पीड पराई जाणयो रे !!**

या उक्ती प्रमाणेच ते आणि त्यांचे धाकटे बंधू परम आदरणीय ती. स्व. जयवंतराव गुंजाळ पाटील (मा. सभापती, संगमनेर तालुका मार्केट कमिटी, संस्थापक चेअरमन, दूधगंगा दूध सोसायटी आणि पतसंस्था, मा. चेअरमन, संगमनेर पावबाकी सोसायटी, ई. )यांनी संपूर्ण जीवन तळागाळातील तसेच सर्वच समाज घटकांसाठी खर्ची घातले. त्यांचा जन्म १२ डिसेंबर १९२९ रोजी झाला होता. त्यांना ९८ वर्षांचे संपन्न आयुष्य लाभले. महत्त्वाचे म्हणजे ते, संत जनार्दन स्वामी यांचे अतिशय आवडते व अंतरंगी शिष्य होते. त्यामुळेच की काय, शेवटपर्यंत त्यांच्या चेहऱ्यावर अध्यात्माचे तेज आणि हास्य विलसत होते.

गुंजाळ पाटील घराण्याला अतिशय संपन्न व संस्कारी आणि समाज सेवेचा वारसा वाढ वडिलांकडून मिळाला. ह्या घराण्याचे संत तुकाराम महाराज यांचे बरोबर नातेसंबंध होते. तसेच छत्रपती महाराज यांचे प्रत्यक्ष आगमन देवी गल्ली येथील सप्तशृंगी मातेच्या मंदिरात व पाटील वाड्यात पण झालेले होते. ( संदर्भ: स्वर्गीय बाबासाहेब पुरंदरेजी यांचे संगमनेर येथील व्याख्यान) त्यांचे वडील परम आदरणीय तीर्थ स्वरूप स्वर्गीय भाऊसाहेब पाटील गुंजाळ हे संगमनेर शहरासह बाजूच्या गावांचे वतनदार पाटील ( उदा. गुंजाळवाडी, घुलेवाडी, सुकेवाडी, खांजापुर, इत्यादी). परंतु ह्या घराण्याने वतनाचा किंवा हजारो एकर जमिनीचा किंवा विविध पदांचा कुठलाही अहंकार न बाळगता, त्यांनी त्याचा वापर हसतमुखाने समाजाच्या सामाजिक , सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक पुनरुत्थानासाठी केला. एका अर्थाने मुंबईची पाया भरणी जशी जगन्नाथ शंकर शेठ यांनी केली, तशीच संगमनेरची पायाभरणी स्वतःच्या मोक्याच्या ठिकाणच्या काही हेक्टर जमिनी, तसेच स्वतःला आर्थिक झळ सोसून, सामाजिक जाणिवेतून मुक्तहस्ते विनामूल्य विविध उपक्रमांसाठी दिल्या. शेवट पर्यंत ते , शतहस्त समाहर सहस्त्र हस्त संकीर (अर्थात: शंभर हातांनी कमवावे आणि हजार हातांनी वाटावे) ह्या सुभाषिता प्रमाणेच जगले.

त्यांनी इंग्रजांच्या काळात छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक चळवळीला प्रतिसाद देत जिल्ह्यातील सर्व समाज घटकांच्या मुलांना शिक्षणाची गंगा त्यांचे पण जीवनात अवतरावी म्हणून आपल्या घास बाजार येथील दुसऱ्या वाड्यात मराठा बोर्डिंग ची स्थापना केली आणि गावोगावी दवंडी देऊन बोलावले आणि त्यांची विनामूल्य राहण्याची, जेवणाची आणि शिक्षणाची सोय करून दिली. त्यातून शिकून मोठे झालेले नाव म्हणजे उदाहरणार्थ ह्या भागाचे पहिले खासदार एडवोकेट पंढरीनाथ कानवडे साहेब. यायोगे मराठा बोर्डिंग आणि ब्राह्मण बोर्डिंग या रूपाने संगमनेर हे पुण्यानंतर महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र बनले.

आणखी एक ऐतिहासिक घटना म्हणजे, आशिया खंडातील पहिला साखर कारखाना उभारणी करता पण या घराण्याने योगदान दिले. संगमनेर तालुक्यातील शेअर्स गोळा करण्याकरीता पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील हे गुंजाळ पाटलांच्या वाड्यातच येत असत. इंग्रजांच्या काळापासून संगमनेर हे तसे अशांत शहर म्हणून पण प्रसिद्ध होते. येथे बराच वेळा दंगली होत असत. एकदा इंग्रजांच्या काळात अशीच भयानक परिस्थिती तयार झाली. इंग्रज अधिकारी पण हतबल झाले आणि त्यांनी शेवटचा उपाय म्हणून तीर्थ स्वरूप भाऊसाहेब पाटील गुंजाळ यांना दोन्ही पार्ट्यांना समजून सांगण्याची विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी समेट घडून आणला. आणि दंगल टळली. म्हणून इंग्रजांनी त्यांना राष्ट्रपिता महात्मा गांधींना दिलेली कैसर-ई-हिंद ही पदवी दिली होती. १९५६ च्या महाप्रलयंकारी महापुरा मध्ये संगमनेरचा देवी गल्लीतील बराचसा भाग पाण्याखाली गेला होता. अशा कठीण परिस्थितीत समाजातील सर्व जाती-धर्मातील लोकांना पाटील



वाड्यात मुक्तहस्ते प्रवेश दिला गेला. त्यांचे अश्रू पुसून आणि खंबीरपणे पाठीशी उभे राहून, त्यांची सर्व काळजी बरेच दिवस घेतली. त्यानंतरही त्यांनी सर्वांना सर्वतोपरी मदत केली.

परंतु, असा संपन्न वारसा आमचे मामासाहेब परम आदरणीय तीर्थ स्वरूप बाळासाहेब पाटील गुंजाळ यांनी पुढेच नेला नाही तर, परम आदरणीय श्रीमान भाऊसाहेब जी थोरात साहेब, श्रीमान प्रभाकर रावजी भोर साहेब आणि श्रीमान चौधरी मामासाहेब यांचे बरोबर अतिशय सामर्थ्याने आणि सामाजिक, सहकार, सांस्कृतिक आणि शैक्षणिक योगदानाच्या माध्यमातून तन-मन-धनाने आणि निरपेक्षपणे केले. त्यायोगे एका दुष्काळी तालुक्याचा कायापालट नंदनवनात झाला आणि संगमनेरचा लौकिक महाराष्ट्रात आणि देशामध्ये वाढविला. आनंदाच्या किंवा कितीही कठीण प्रसंग आला तरी त्यांचा स्वभाव अतिशय नम्र, मनमिळाऊ, हसतमुख आणि परोपकारी होता. ते सर्वांची आस्तेवाईक पणे आणि आपुलकीने चौकशी करत असत.

त्यांनी सन्माननिय भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना, तालुका शेतकी सहकारी संघ , या संस्थांच्या स्थापने पासून योगदान दिले आणि त्यांचे चेअरमन पद ही बराच काळ भूषविले. संगमनेर तालुका मार्केट कमिटी उभारणी, संगमनेर तालुका सहकारी दूध संघाचे प्रथम चेअरमन म्हणून, तसेच ते अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था, अमृत नगर , संगमनेर या संस्थेचे तहहयात उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. तसेच ते अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे डायरेक्टर म्हणून पण कार्यरत होते. तालुक्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी १९६६ साली स्थापन झालेल्या सह्याद्री बहुजन विकास संस्थेकरीता तसेच अहिल्या नगर जिल्हा सहकारी बँक व सहकार सभागृह या करीता संगमनेर शहरातील जमीन दोन्ही भावांनी विनामोबदला दान म्हणून दिली.

तसेच रेस्ट हाऊस, एस. टी. स्टँड समोरील महाराष्ट्र विद्युत मंडळाच्या जमिनी पण त्यांच्याच, तसेच मा. न्यायाधीश साहेब, मा. प्रांत साहेब बंगला या जमिनी पण विना मोबदला दान दिलेल्या. तसेच अमृत वाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेलाही काही जमिनी त्यांचे शब्दाखातर मिळवून दिल्या. परंतु, त्यांनी व त्यांचे धाकटे बंधु (राम लक्ष्मण) परम आदरणीय ती. स्व. जयवंतराव गुंजाळ पाटील यांनी त्याचा केव्हाही अभिनिवेश बाळगला नाही.

**शतेषु जायते शुरः सहस्त्रेषु च पंडितः !**
**वक्ता दशसहस्त्रेष दाता भवति वान वा !!**

(अर्थात: शंभर लोकांमध्ये एक शूर , हजार लोकांमध्ये एक पंडित , दहा हजार लोकांमध्ये एक वक्ता जन्मतो आणि दाता मिळणे महा कठीण, फारच विरळ ) या उक्ती प्रमाणे हे अतिशय दुर्मिळ उदाहरण आहे.



ती. स्व. मामासाहेब मिळून हे एकुण ६ भावंडे. दोन बंधु (राम लक्ष्मण) आणि चार बहिणी. पैकी परम आदरणीय ती. स्व. रत्नादेवी ह्या सुप्रसिद्ध अंभोरकर घराण्यातील, परम आदरणीय ती. स्व. बबनराव देशमुख अंभोरकर यांच्या भगिनी. त्यांचे लग्न अंभोरकर वाड्यातच झाले. धाकटे बंधु परम आदरणीय ती. स्व. जयवंतराव गुंजाळ पाटील यांच्या पत्नी, ती. स्व. सुशिलादेवी ह्या भाळवणी (ता. आष्टा, बीड) येथील सुप्रसिद्ध राजे निंबाळकर घराण्यातील आणि परम आदरणीय स्व. विलासरावजी देशमुख साहेब यांच्या मावशी)

बहिणी: १) सर्वात मोठ्या परम आदरणीय ती . स्व. रत्नादेवी कृष्णराव राजे जाधवराव (राजमाता जिजाऊ साहेब यांचे घराणे), माहेगाव देशमुख, ता. कोपरगाव, २) परम आदरणीय ती. रु. तान्हुबाई नानासाहेब वाघ (काळखोडे, लासलगाव ) ३) परम आदरणीय ती स्व. कमला देवी (मेजर) पवार साहेब यांना (चिंचोली, ता. पोलादपूर, जि. सिंधुदुर्ग) ४) परम आदरणीय ती. स्व. इंदुमती देवी अण्णासाहेब जाधवराव (धरणाची वाडी, ता. माणगाव, जि. रायगड) ५) परम आदरणीय ती. स्व. चंद्रकला देवी वसंतराव देशमुख (रुई (शिर्डी), ता. राहता).

**श्री. विश्वास वाघ (भाचा)**
**मो. ९८९०८९०५२१**

# जन्म-मृत्यू दाखले वितरणातील अडथळे दूर करा -आमदार खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यात नागरी नोंदणी प्रणालीद्वारे जन्म व मृत्यू नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र, या प्रणालीतील तांत्रिक व प्रशासकीय त्रुटींमुळे संगमनेर तालुक्यासह ग्रामीण भागातील नागरिकांना जन्म व मृत्यू दाखले मिळविताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे त्यातील अडथळे दूर करा अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेमध्ये औचित्याच्या मुद्द्याद्वारे प्रश्न उपस्थित करून राज्य शासनाचे या प्रमुख प्रश्नाकडे लक्ष वेधले.

सन २०२३ पूर्वीच्या जन्म व मृत्यू नोंदींसाठी प्रत्येक प्रकरणात तहसीलदारांच्या स्वतंत्र मंजुरीची अट असल्याने दाखले मिळण्यास मोठा विलंब होत आहे. परिणामी, नागरिकांची आर्थिक, मानसिक आणि प्रशासकीय गैरसोय होत असून शासकीय कार्यालयांच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत, असे आमदार खताळ यांनी सभागृहात नमूद केले.




लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ तसेच स्थानिक जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालयांकडून ही अडचण वारंवार शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. मात्र, अद्याप आवश्यक कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ, शैक्षणिक प्रवेश, वारसा हक्क, निवृत्तीवेतन तसेच विविध कायदेशीर कामांसाठी आवश्यक असलेले जन्म व मृत्यू दाखले वेळेत मिळत नसल्याने गंभीर अडचणी निर्माण होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

या समस्येवर उपाय म्हणून सन २०२३ पूर्वीच्या जन्म व मृत्यू नोंदींसाठी असलेली तहसीलदार मंजुरीची अट शिथिल करण्यात यावी, जिल्हास्तरावरच दाखल्यांना मंजुरी देण्याची सुलभ व्यवस्था निर्माण करावी, नागरी नोंदणी प्रणालीतील तांत्रिक व प्रशासकीय त्रुटी तातडीने दूर कराव्यात आणि नागरिकांना वेळेत जन्म व मृत्यू दाखले उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागाला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी सभागृहात केली. राज्य शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन नागरिकांना तातडीने दिलासा देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणी आ. अमोल खताळ यांनी विधानसभेत केली.

# अनुदानासह प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षकांचा एल्गार

## ७ व ८ जुलैला राज्यभर अंशतः अनुदानित शाळा बंद

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रातील अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिक्षक समन्वय संघाने ०७ व ०८ जुलै २०२६ रोजी राज्यातील सर्व अंशतः अनुदानित शाळा बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील हजारो शाळांमधील अध्यापनाचे कामकाज दोन दिवस ठप्प ठेवून आझाद मैदानावर हजर रहावे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अनुदानासह विविध मागण्यांबाबत शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे राज्यातील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी असून, अखेर शाळा बंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे.

या आंदोलनात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रत्येक शाळेने आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवून शासनापर्यंत आपल्या न्याय्य मागण्या पोहोचवाव्यात, असे आवाहन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने करण्यात आले आहे.



संघटनेच्या मते, शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी वर्षानुवर्षे प्रामाणिक सेवा बजावली आहे; मात्र त्यांना आर्थिक व प्रशासकीय न्याय मिळालेला नाही. त्यामुळे हा लढा केवळ शिक्षकांचा नसून शिक्षण व्यवस्थेच्या सन्मानासाठी असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घेऊन प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल असा इशाराही यावेळी शिक्षक समन्वय संघाने दिला आहे.

# दंडे गोल्ड अँड डायमंड्सतर्फे सिन्नर येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य व दप्तर वाटप

## शताब्दी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांसाठी सामाजिक बांधिलकीचा उपक्रम

नाशिक रोड येथील सराफी पेढी दंडे गोल्ड अँड डायमंड्स हे आपल्या १०० व्या वर्षात पदार्पण करत असून, शताब्दी वर्षानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. समाजाने दिलेल्या प्रेम, विश्वास आणि पाठबळाची कृतज्ञतापूर्वक परतफेड करण्याच्या भावनेतून संस्थेतर्फे सिन्नर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य व दप्तर वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा पाया असून, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे या उद्देशाने शालेय दप्तर, वह्या व अन्य शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस प्रोत्साहन मिळाले आहे.

यावेळी दंडे गोल्ड अँड डायमंड्सचे जनरल मॅनेजर श्री. याकुब शेख, श्री. राहुल म्हस्के, श्री. आशीष अनर्थे, कु. मयुरी बहीकर, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

दंडे गोल्ड अँड डायमंड्सचे संचालक श्री. अनिल गोविंद दंडे व श्री. योगेश्वर धनंजय दंडे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारण्यात आला. शंभर




वर्षांच्या या प्रवासात समाजाने आणि ग्राहकांनी दंडे गोल्ड अँड डायमंड्सवर दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शताब्दी वर्षात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांच्या शिक्षणासाठी दिलेला छोटासा हातभार हीच आमच्यासाठी शताब्दी वर्षातील सर्वात मोठी भेट असल्याची भावना संस्थेतर्फे व्यक्त करण्यात आली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अनेक संस्था शाळांमध्ये विविध उपक्रम राबवितात; मात्र दंडे गोल्ड अँड डायमंड्सतर्फे विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या उच्च दर्जाच्या वह्या, शालेय साहित्य आणि मजबूत, टिकाऊ दप्तरांमधून विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता दिसून येते. विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन करण्यात आलेला हा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद असून, याचा विद्यार्थ्यांना निश्चितच लाभ होणार आहे. शताब्दी वर्षानिमित्त समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दंडे गोल्ड अँड डायमंड्सचा हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी आहे.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांनी दंडे गोल्ड अँड डायमंड्सने राबविलेल्या या समाजोपयोगी उपक्रमाबद्दल संस्थेचे मनःपूर्वक आभार मानले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांना हातभार लावणारा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

समाजाच्या विश्वासावर उभ्या राहिलेल्या दंडे गोल्ड अँड डायमंड्सकडून शताब्दी वर्षात समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला असून, दंडे गोल्ड अँड डायमंड्सने गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली आहे. शताब्दी वर्षानिमित्त भविष्यातही अशाच स्वरूपाचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे संस्थेतर्फे सांगण्यात आले.